## नियमित दिवाणी मुकदमा नं.७१/२०२५ मधील नि.०५ खालील आदेश
## (सानिया युसुफ मुल्ला वि. सादिक अल्लाऊद्दीन कोतवाल)

यातील वादी हिने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०२.** वादीतर्फे वकिल श्री. एम. ए. शेख यांचा युक्तिवाद ऐकला.

**०३.** वादीतर्फे वकिलांनी युक्तिवाद केला की, दावा मिळकत ही वादी हिची वडिलार्जीत मालकी वहिवाटीची मिळकत असुन, सदरची मिळकत ही वादी हिचे वडील युसुफ मुल्ला यांचेकडून क्रि.कि.अर्ज नं.३२७/२०१५ चे कामी झालेल्या आपसात तडजोड प्रमाणे मिळालेली आहे. सदरची मिळकत वादीची आई हिने स्वत:साठी व वादीसाठी आपसात तडजोड मान्य करुन, दावा मिळकत आपल्या कब्जेत घेतली व त्यावेळी वादीचे वय ११ वर्षे होते व ती शिक्षण घेत होती. दावा मिळकत ही वादी व तिची आई या दोघींची मिळकत असताना, तसेच वादी ही अज्ञान असताना, प्रतिवादी क्र.०१ यांनी गैरफायदा घेऊन वादीचे आई कडून खोटा हिब्बानामा करुन घेतलेला आहे. पुढे त्यांनी युक्तिवाद केला की, वादी ही अज्ञान असल्याने हिब्बानामासाठी कोर्टातील कोणतीही परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे सदरचा हिब्बानामा हा वादीवर बंधनकारक राहिल. पुढे त्यांनी युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्र.०२ यांनी दावा मिळकत पुन्हा वादी यांचेकडून हिब्बानाम्याने करुन घेतलेली आहे. परंतु, सदरचा हिब्बानामा देखील खोटा व चुकिचा असा आहे. यातील वादी हिचेवर दोन्हीही हिब्बेनामे बंधनकारक नाहीत. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. तसेच यातील प्रतिवादी हे सदर खोटया हिब्बानाम्याद्वारे दावा मिळकतीच्या पत्रकी आपले नाव लावण्याच्या प्रयत्नात असून, दावा मिळकत विल्हेविक्री व तबदिल करण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे सदर दावेचे कामी एकतर्फा तुर्तातुर्त मनाई आदेश व्हावा अशी विनंती केली.

**०४.** वादीचे दाव्याचे व मनाई अर्जाचे आणि कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी हिने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी यांनी केलेले दावा मिळकती संदर्भातील हिब्बानामा रद्द होऊन मिळणेकरिता तसेच कायम मनाईकरिता दाखल केलेला आहे. यातील वादी हिचे कथन असे आहे की, यातील प्रतिवादी यांनी वादी हिच्या आईचा भोळसट स्वभावाचा व ती नेहमी आजारी पडत असल्याचा गैरफायदा घेऊन हिब्बानामा केलेले आहेत. यातील वादी हिचे कथन असे आहे की, यातील प्रतिवादी हे सदर हिब्बानामाद्वारे दावा मिळकतीच्या पत्रकी नाव लावण्याच्या प्रयत्नात असून, नाव लावल्यानंतर मिळकत विल्हेविक्री करणेच्या प्रयत्नात आहेत. सदर प्रकरणात कोणताही आदेश करणेपूर्वी प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकूण घेणे योग्य वाटते. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे.

**आ दे श**

प्रतिवादी यांना कारणे दाखवा नोटीस काढणेत यावी.

ANIRUDHA SUNIL RANE Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE Date: 2025.03.21 15:39:42 +0530

**(श्री. ए. एस. राणे)**

**दि.२१.०३.२०२५** **तिसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.P. Patil |
| Court | : | III[rd] Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Date of Decision | : | 21/03/2025 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 21/03/2025 |
| Judgment/Order uploaded on | : | 21/03/2025 |